# जाहिरात प्रारुप
## राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद ,नागपुर
### कंत्राटी पदाकरिता थेटमुलाखती

राष्ट्रीय आरोग्य अभियान नागपुर अंतर्गत जिल्हापरिषद व महानगरपालिका व नगरपंचायत स्तरावर खाली कंत्राटी पदे मुलाखती व्दारे भरावयाची आहे.करिता इच्छुक उमेंदवारांनी सोबत जोडलेल्या अर्ज नमुन्यानुसार आवश्यक शैक्षणीक कागदपत्रांसह खालील वेळापत्रानुसार कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावा.

रिक्त पदाचा तपशील पुढील प्रमाणे आहे .

| अ. क्र | पदनाम | शैक्षणीक अहर्ता | एकुण रिक्त पदे | आरक्षित रिक्त पदाचा तपशील | वयोमर्यादा | दैनिक भत्ता( ३००रु )प्रमाणे महिन्यातील २५ दिवस | रिक्त पदांचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गटप्रवर्तक(आशा योजना) | किमान पदवीधर(कोणत्याही शाखेचा) | ३ | महिला करीता राखीव | २१ ते ३८ | रु ८७२५/- | जिल्हापरिषद -१ ,महानगरपालिका-१,नगरपंचायत -१ (कामठी) |

**आवश्यक कागदपत्रे** - खालील कागदपत्रांची मुळ प्रतीची छायांकित प्रत स्वसाक्षांकीत करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील .

१)पदवी प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३)इतर शैक्षणिक अर्हताबाबतची प्रमाणपत्र ४) संगणक अहर्तचे प्रमाणपत्र ५) टायपिंग प्रमाणपत्र मराठी (३०) व इंग्रजी (४०) प्रमाणपत्र ६) जातीचे प्रमाणपत्र ७) शाळा सोडल्याचा दाखला /जन्मतारखेचा दाखला ८) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे ९) पासपोर्ट आकाराचा फोटो

टिप- अर्ज जोडलेल्या नमुन्यातच सादर करावा.तसेच भरती बाबतचे वेळापत्रक व थेट मुलाखत दिनांक,निवड,प्रतीक्षा यादी इ.बाबतची सर्व माहिती व जाहीरात अटी व शर्तीसह www.nagpurzp.com वर उपलब्ध आहे .

अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक - **दि ०८/०८/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यत**

पात्र ,अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द - **दि. १३/०८/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यत**

आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक - **दि. १९/०८/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यत**

मुलाखतीसाठी पात्र उमेंदवाराची यादी प्रसिध्द -**दि.२२/०८/२०१९ सायंकाळी ५.०० पर्यत**

**मुलाखतीचा दिनांक पात्र उमेदवारांच्या यादीसोबत प्रसिध्द करण्यात येईल .**

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

www.oac.co.in

**अटी व शर्टी –**

१) सदर पद हे महिला उमेदवारासाठी राखीव राहील.

२) सदर पदे ही आशास्वंसेविकेच्या कार्यक्षेत्रात २५ दिवस भेटी देण्याकरिता प्रवास भत्ता रु३००/- याप्रमाणे राहणार आहे .

३) ज्या ठिकाणी आशा योजनेच सॉफटवेअर चालु होईल तेव्हा माहिती अदयावत करण्याचे ५ दिवासाचे रु २५०/- प्रमाणे मानधन मिळणार आहे.

४) जिल्हास्तरावर होणा-या मासिक आढावा बैठकीकरीता रु २००/-

५) मोबाईल भत्ता रु १५० /-

**जिल्हास्तरावरील गटप्रर्वकाबाबत –**

१) जिल्हास्तरावरील गटप्रवर्तक जिल्हा समुह संघटकांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील

२) जिल्हास्तरावरील गटप्रवर्तक कार्यालयात आशा स्वंयसेविका योजनेच्या कामकाजात मदत करणार असुन त्यांना कामावर आधारित मोबदला देय राहील.

३) या कार्यालयामार्फत जिल्हयांस गटप्रवर्तकाचे एक स्वतंत्र पद मंजुर केल्यामुळे सदर पर जिल्हयांच्या तालुक्यास उपलब्ध करुन दयावे तालुकास्तरावरील तरतुदीतुन गटप्रवर्तकांस नमुद मोबदला दरमहा अदा करण्यात यावा.

४) सदर पदाची गणना जिल्हयांच्या तालुक्यांच्या गटप्रवर्तकांच्या संख्येमध्ये करण्यात यावी.

५) गटप्रवर्तकांची आस्थापना जिल्हयांच्या तालुक्यात राहणार असुन पदस्थापना जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयात राहील .

६) जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने संबधित गटप्रवर्तकांचा मासीक अहवाल दरमहा संबधित तालुक्यास पाठविण्यात यावा. सदर अहवालाच्या आधारावर संबधित गटप्रवर्तकांचा कामावर आधारित मोबदला अदा करण्यात यावा.

७) जिल्हास्तरावरील गटप्रवर्तकांना कार्यालयातील इतर कर्मचा-याप्रमाणे सुटटया देय राहील.

८) जिल्हास्तरावरील गटप्रवर्तक जितक्या ( २५ दिवसाच्या अटीच्या अधिन राहुन ) दिवस काम करतील तितक्या दिवसाचा कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात यावा.

९) जिल्हास्तरावरील गटप्रवर्तक फक्त आशा स्वंयसेविका योजनेपुरती मर्यादित असेल जिल्हा प्रशासनाने त्यांस इतर कामकाजाची जबाबदारी देवु नये .

१०)गटप्रवर्तकांचे काम असमाधानकारक आढळल्यास जिल्हा समुह संघटकांच्या अहवालावरुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मान्यतेने गटप्रवर्तकास पदावरुन कमी करता येईल

११)जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापकांनी गटप्रवर्तकास स्वंतत्र बसण्याची व्यवस्था एन.एच.एम. कक्षात करावी तसेच संगणक तसेच प्रिंटर उपलब्ध करुन देण्यात यावा.

१२)काही अपरिहार्य कारणामुळे जिल्हास्तरावरील गटप्रवर्तक म्हणुन काम करावे लागु शकते याबाबत नियुक्ती देतांना अवगत करावे .

१३)पी.आ.पी मध्ये कामावर आधारित मोबदल्यात बदल झाल्यास सदर बदलानुसार मोबदला अदा करण्यात यावा.

www.oac.co.in

**महानगरपालिकास्तरावरील गटप्रवर्तकाबाबत -**

१) महानगरपालिकेतील क्षेत्राकरीता ग्रामीण भागातील एक गटप्रवर्तकांचे पद मंजुर करण्यात येत असुन सदर पदाची निवड प्रक्रिया जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येईल.

२) सदर गटप्रवर्तक महानगरपालिका क्षेत्रातील आशा स्वंयसेविका योजनेच्या कामकाजात मदत करणार असुन त्यांना कामावर आधारीत मोबदला देय राहील .

३) या कार्यालयामार्फत महानगरपालिकेकरिता गटप्रवर्तकाचे एक स्वंतत्र पद मंजुर केलेले असुन सदर पदाची आस्थापना संबधित जिल्हयांच्या तालुक्यात राहील .

४) सदर पदाची गणना जिल्हयांच्या तालुक्याच्या गटप्रवर्तकांच्या संख्येमध्ये करण्यात यावी.

५)जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे स्वाक्षरीने संबधित गटप्रवर्तकांचा मासीक अहवाल दरमहा संबधित तालुक्यास पाठविण्यात यावा. सदर अहवालाच्या आधारावर संबधित गटप्रवर्तकांचा कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात यावा.

६) महानगरपालिका स्तरावरील गटप्रवर्तक जितक्या ( २५ दिवसाच्या अटीच्या अधिन राहुन )दिवस काम करतील तितक्या दिवसाचा कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात यावा.

७) महानगरपालिका स्तरावरील गटप्रवर्तक फक्त आशा स्वंयसेविका योजनेपुरती मर्यादित असेल.

८) गटप्रवर्तकांनी दररोज केलेल्या कामकाजाचा बाबत जिल्हा समुह संघटकांना अवगत करणे क्रमप्राप्त राहील

९) गटप्रवर्तक आठवडयातुन एकदा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात येवुन जिल्हा समुह संघटक यांना अहवाल सादर करुन पुढील आठवडयातील कामकाजाचे नियोजन करतील

१०) जिल्हा समुह संघटकांने दैनदिन भेटी व्यतिरिक्त नागरी/ग्रामीण आशा स्वंयसेविका संदर्भातील इतर काम करण्याची जबाबदारी दिल्यास सदर दिवस कार्यक्षेत्र भेट म्हणुन गुहित धरण्यात येईल त्याप्रमाणे त्या दिवसाचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अदा करण्यात यावा.

११)गटप्रर्वकांची आस्थापना जिल्हयांच्या तालुकयात राहणार असुन पदस्थापना महानगरपलिकेत राहील.

१२) वैदयकीय आरोग्य अधिकारी ,महानगरपालिका यांनी संबधित गटप्रवर्तकांस कार्यालयीन कामकाजाकरीता स्वतंत्र संगणक उपलब्ध करुन दयावा

१३) नागरी भागात आशा स्वंयसेविका योजनेच्या योग्य अमंलबजावणी करीता आवश्यक ती कार्यवाही संबधित गटप्रवर्तकाकडुन जिल्हा समुह संघटकांनी करुन घ्यावी.

www.oac.co.in

१४) गटप्रवर्तकांचे काम असमाधानकारक आढळल्यास जिल्हा समुह संघटकांच्या अहवालाच्या आधारावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मान्यतेने गटप्रवर्तकास पदावरुन कमी करता येईल

१५)गटप्रवर्तकाकडुन महानगरपालिका क्षेत्रातील आशा स्वंयसेविका योजनेचे काम करवुन घेण्याची जबाबदारी ही जिल्हा समुह संघटकांची राहील

१६) तालुका समुह संघटक किंवां गटप्रवर्तकांच्या बैठकीमध्ये महानगरपालिकेतील गटप्रवर्तकास सहभागी करुन घेवुन त्यांच्याकडुन नागरी भागातील आशा स्वंयसेविका योजनेचा आढावा घेण्यात यावा.

१७)जिल्हास्तरावरील गटप्रवर्तकांना कार्यालयातील इतर कर्मचा-याप्रमाणे सुटटया देय राहील

१८) जिल्हास्तरावरील गटप्रवर्तक जितक्या दिवस काम करतील तितक्या दिवसाचा कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात यावा.

१९)आशा स्वंयसेविका योजनेपुरती मर्यादीत असेल. महानगरपालिका प्रशासनाने त्यांस इतर कामकाजाची जबाबदारी देवु नये .

२०) गटप्रवर्तकाचे काम असमाधानकारक आढळल्यास जिल्हा समुह संघटकांच्या अहवालावरुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मान्यतेने गटप्रवर्तकास पदावरुन कमी करता येईल.

२१) काही अपरिहार्य कारणामुळे जिल्हास्तरावरील गटप्रवर्तकांच्या पदस्थापने बदल होवु शकतो त्यांना प्रत्यक्ष जावुन आशा स्वंयसेविका गटप्रवर्तक म्हणुन काम करावे लागु शकते याबाबत नियुक्ती देतांना अवगत करावे .

२२) पी.आ.पी मध्ये कामावर आधारीत मोबदल्यात बदल झाल्यास सदर बदलानुसार मोबदला अदा करण्यात यावा.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर

www.oac.co.in